




नांदेड, परभणी, लातूर, हिंगोली येथे वितरीत होणारे वृत्तपत्र

# दैनिक श्रमिक लोकराज्य

संपादक – डोईजड ज्ञानेश्वर बालाजीराव : 7875782377 कार्यकारी संपादक – वैजनाथ स्वामी

दैनिक । नांदेड । वर्ष ३ रे । अंक १७४ । शुक्रवार, दिनांक ०८ मार्च २०२४ । RNI MAHMAR/2021/85782 । पाने ४ । DAINIK SHRAMIK LOKRAJYA । किंमत २ रूपये । ई–पेपर : www.shramiklokrajya.in




















# संपादकीय

## भाजपमधील महिला नेत्यांच्या महत्त्वाकांक्षा पल्लवीत

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या १९५ उमेदवारांची यादी भाजपने नुकतीच जाहीर केली. त्यामध्ये गोव्यातील दोनपैकी उत्तर गोवा मतदारसंघातील उमेदवार जाहीर झाला. उत्तर गोव्याचे खासदार तथा केंद्रीय पर्यटन राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांना पुन्हा एकदा ही उमेदवारी मिळाल्याने ते सहाव्यांदा रिंगणात उतरतील. यापूर्वी सलग पाचवेळा उत्तर गोव्यातून विजयी झालेले श्रीपादभाऊ हे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी व त्यानंतर विद्यमान मोदी सरकारच्या कार्यकाळ सर्वाधिक काळ केंद्रात मंत्री राहिलेले गोव्यातील भाजप नेते आहेत. लोकसभा निवडणुकीत सलग पाचवेळा विजयी होण्याचा विक्रम यापूर्वी काँग्रेसचे खासदार एदुआर्द फालेरो यांच्या नावावर आहे. सन १९७७ ते १९९१ या कार्यकाळात दक्षिण गोव्यातून ते खासदार होते. उत्तर गोव्यातून अशी विक्रमी कामगिरी भाजपतर्फे श्रीपाद नाईक यांनी नोंदविली आहे. आतापर्यंत मोठ्या मताधिक्क्याने विजयी झालेल्या श्रीपादभाऊ यांना यंदा उमेदवारी मिळविताना त्यांच्याच पक्षातील काही उमेदवारांशी स्पर्धा करावी लागली. अखेर हे आव्हान पेलण्यास ते यशस्वी ठरले तरी त्यांची खरी कसोटी प्रत्यक्ष निवडणुकीच्या रिंगणात लागणार आहे. काँग्रेस–आप युतीचा उमेदवार हा भाजपसमोरील मुख्य प्रतिस्पर्धी असून त्यांनी अद्याप आपले उमेदवार जाहीर केलेले नाहीत. माजी केंद्रीय मंत्री रमाकांत खलप व इतर एक–दोन नावे सध्या चर्चेत आहेत. काँग्रेसचे गोवा प्रभारी माणिकराव ठाकरे गोव्यात दाखल झाले असून त्यांनी संभाव्य उमेदवारांच्या निवडीसाठी स्थानिक नेत्यांशी चर्चाही सुरू केली आहे. काँग्रेसच्या दिल्लीतून जाहीर होणाऱ्या यादीत गोव्यातील उमेदवारांची नावे जाहीर होण्याची अपेक्षा आहे. एकंदरीत राज्यात भाजप, काँग्रेस व 'आप'ने लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर मोर्चेबांधणी सुरू केली आहे. रिव्होल्युशनरी गोवन्स सोडल्यास अन्य प्रादेशिक पक्ष या निवडणुकीत केवळ युती व पाठिंब्याचे धनी राहिले असल्याने त्यांच्या गोटात फारसा उत्साह दिस नाही.यंदाच्या लोकसभा निवडणुकीबाबत खरी उत्सुकता ताणली आहे, ती दक्षिण गोव्यातून. दक्षिणेतील उमेदवारावर भाजपाचे घोडे अडलेले असताना पक्षाच्या वरिष्ठ पातळीवरून अचानकपणे त्याला कलाटणी देत, नवीनच रणनीती आखली गेली आहे. माजी खासदार ॲड. नरेंद्र सावईकर, माजी उपमुख्यमंत्री बाबू कवळेकर, माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत ही नावे संभाव्य उमेदवार म्हणून अंतिम टप्प्यात पोहोचलेली असताना, भाजपने धक्का तंत्राचा वापर करीत दक्षिणेतून महिला उमेदवार देण्याचे जाहीर केले आहे. प्रदेशाध्यक्ष सदानंद तानावडे व मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनीही त्याला जाहीर पुष्टी दिल्याने सध्या भाजपमधील महिला नेत्यांच्या महत्त्वाकांक्षा पल्लवीत झाल्या आहेत.मुख्यमंत्र्यांच्या पत्नी व राज्य महिला मोर्चाच्या माजी अध्यक्ष असलेल्या सुलक्षणा सावंत, प्रखर हिंदुत्ववादी शेफाली वैद्य यांच्यासह बरीच नावे सध्या उमेदवारीसाठी चर्चेत आहेत. काही महिलांच्या उमेदवारीचा पक्षातर्फे विचार चालला असून काहींनी स्वच्छेने आपली नावे जाहीर केली आहेत. जिंकण्याची क्षमता या निकषावर संभाव्य महिला उमेदवारांची यादी तयार झाली असून त्यापैकी एक नाव जवळजवळ निश्र्चित झाल्याचे संकेत प्रदेशाध्यक्ष तानावडे यांनी दिल्याने भाजपची तयारी कुठवर पोहोचली आहे, हे स्पष्ट होते. या पार्श्र्वभूमीवर भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस आशिष सुद हे गोव्यात दाखल झाले आहेत. त्यांचा हा गोवा दौरा म्हणज 'नारी शक्ती वंदन' कार्यक्रमासाठी आहे, असे सांगितले जात असले तरी हा निव्वळ योगायोग म्हणता येणार नाही! दक्षिण गोव्यातील भाजपच्या या रणनीतीमुळे विरोधी पक्षालाही आपल्या रणनीतीवर फेरविचार करावा लागेल. गोवा दौऱ्यावर असलेल्या माणिकराव ठाकरे यांच्या बैठकीत कदाचित हा विचार होणे क्रमप्राप्त आहे. शिवाय काँग्रेस व मित्रपक्षांतील काही महिला उमेदवारांची महत्त्वाकांक्षा जागृत होऊन त्यांनी उमेदवारीसाठी आग्रह धरल्यास पक्षापुढे पेच निर्माण होऊ शकतो. मोदी सरकारने महिलांना राजकीय आरक्षणाचा संसदीय मार्ग मोकळा केला असून दक्षिण गोव्यातून त्याची नांदी झाल्यास त्याचे स्वागतच करावे लागेल. महिन्याभरापूर्वी पंतप्रधान मोदी यांची सभा दक्षिण गोव्यात झाली होती. आजपर्यंत जे मतदारसंघ भाजपच्या खात्यात जमा झालेले नाहीत, त्यावर विशेष लक्ष केंद्रीत करणे हा लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवरील भाजपचा अजेंडा आहे. भाजपच्या हातून कायम निसटणारा दक्षिण गोवा, हा त्यापैकी एक आहे. भाजपची एकंदरीत तयारी पाहता एखादी जागा जिंकायची झाल्यास उमेदवार हा त्यांच्यासाठी प्रातिनिधीक असतो. या अर्थाने पाहिल्यास 'महिला सन्मान ही मोदी गॅरेंटी' सिद्ध करण्यासाठी दक्षिणेत भाजपची ही वेगळी रणनीती दिसते. गोव्यातील आजवरच्या राजकीय इतिहासात काही मोजक्याच महिला नेत्यांनी स्वबळावर आपले कर्तृत्व ठळकपणे सिद्ध आहे पण हे महिला नेतृत्त्व विधानसभेपर्यंत तळपले आहे. माजी मुख्यमंत्री स्व. शशिकलाताई काकोडकर, माजी मंत्री विक्टोरिया फर्नांडिस, संगीता परब, निर्मला सावंत अशी ही मोजकीच यादी आहे. मागील विधानसभा निवडणुकीतून अजून तीन महिला आमदार विधानसभेत पोहोचल्या पण त्यामागे कौटुंबिक राजकीय बळ व पुऊषी महत्त्वाकांक्षा अधिक दिसते. लोकसभा निवडणूक जिंकून गोव्याचे प्रतिनिधीत्त्व केलेल्या माजी खासदार संयोगिता राणे सरदेसाई या एकमेव अपवाद आहेत. १९८० साली मगो पक्षातर्फे त्या उत्तर गोव्यातून खासदार बनल्या होत्या. त्यानंतर राज्यातील नारीशक्ती ग्रामपंचायत व जिल्हा पंचायतपर्यंत सीमित राहिली. ज्या आमदार बनल्या, त्या भक्कम कौटुंबिक राजकीय पाठबळाच्या जोरावर. भाजपकडे आज महिला कार्यकर्त्यांची मोठी फौज आहे. पक्षाच्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी ही नारी आपली शक्ती पणाला लावते. काँग्रेसला घराणेशाहीची दुषणे देत, राजकीय पार्श्र्वभूमी नसलेल्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांना आमदार म्हणून विधानसभेत पोहोचविण्याची प्रथा भाजपानेच सुरू केली. आज इतर पक्षातून आमदार आयात धोरणामुळे ती कितपत शिल्लक आहे, हे निष्ठावान कार्यकर्तेच सांगू शकतील. तूर्त दक्षिणेच्या जागेत महिला उमेदवाराचा विचार, हाच खरा मुद्दा आहे. यापूर्वी काही महिला उमेदवारांनी लोकसभा निवडणूक लढविली आहे. एकतर त्या स्वतंत्र उमेदवार होत्या किंवा त्यांचा पक्ष सत्तेत नव्हता. सत्ताधारी भाजपकडून गोव्यात नारी शक्तीला ही संधी देण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. तो कितपत साध्य होईल, हे उद्याच्या महिलादिनीच स्पष्ट होणार आहे.

# मुखेडचे हेमाडपंथी महादेव मंदीर - एक जागृत देवस्थान

मुखेड शहराचे पौराणिक नाव मोहनावती नगरी असे आहे. मोहनावती वासियांचे ग्राम आराध्य दैवत वीरभद्र स्वामी यांचे जाज्वल्य मंदीर शोभून दिसते आहे. वीरभद्र स्वामी यात्रेसाठी महाराष्ट्रातील अनेक जिल्हयातून तसेच कर्नाटक,आंध्रप्रदेश आणि विदर्भातील अनेक जिल्हयातून भावीक यात्रेनिमित्त मोहनावती नगरीत दाखल होतात.

असे म्हणले जाते की, मोहनावती नगरीत अनेक देव – देवतांनी हजारो वर्षे वास्तव्य केले होते. या नगरीत दशरथ राजाच्या काळातील पौराणिक हेमाडपंथी महादेव मंदीर असून आज तागायत हजारो भक्तगण दर्शनासाठी येतात. मंदिरा पासुन थोडे अंतरावर श्रावण चलमा असून चलम्याच्या आजूबाजूला गवतास श्रावण महीन्यातच गाठी पडतात हे पाहण्यासाठी अनेक भक्तगण गर्दी करतात. मंदीराच्या दक्षिण बाजूस प्रसिद्ध कुंड असून त्यास बारव असेही संबोधले जाते तर त्यास सासा–सूनाची विहीर असेही म्हणतात. विहीर एक जरी असली तरी त्या विहीरीतील पाण्याचे दोन भाग पहाण्यास स्पष्ट दिसतात. पाण्याची संथ अवस्था विस्कळीत करण्याचा प्रयत्न केला तरीही पाण्यातील अर्धा भाग स्पष्ट वेगळा जानवतो. सासा–सूनाची विहीर ही जरी अख्याइका असली तरी विहीरीतील पाणी मात्र वास्तव आहे.

मुखेड मधील या हेमाडपंथी महादेव मंदीराची कथा मात्र रंजक आहे, दशरथ राजा शिकार करण्यासाठी जंगला आला असताना त्याच्या हातून श्रावणबाळ हा आई वडीलांना पाणी आणण्यासाठी चलमा (आज त्या जागेला श्रावण चलमा असे म्हणतात) येथे आला होता पण श्रावणबाळ पाणी घेत असताना पाण्याच्या बुडबुडण्याचा आवाज दशरथ राजाच्या काणी गेला आणि दशरथ राजा जंगलातील प्राणी पाणी पिण्यासाठी आला आहे असे समजून आवाजाच्या दिशेने एका झाडावर बसून त्याने बाण सोडला पण तो थेट श्रावण बाळाच्या काळजात तीर झाला. दशरथ राजा असा एकमेव राजा होता की, तो आवाजाच्या दिशेने बाण सोडत असे व तो न चुकता बरोबर निशाणा साधत असे. दशरथ राजाच्या हातून श्रावणबाळ यांचा मृत्यू झाल्याने पापक्षालनार्थ दशरथ राजाने या ठिकाणी यज्ञ केला व या हेमाडपंथी मंदीरात महादेवाचे शिवलिंग स्थापन केले. तर या मंदीरास दशरथेश्र्वराचे मंदीर असे ही भाविक संबोधतात. या आख्यायिकेची रामायनातही उल्लेख असल्याचे दिसते. अशी ही मंदीराची कथा आहे.





**मंदीराच्या पश्र्चिम बाजूस श्रावण चलमा असून त्याची सुध्दा दुरावस्था झाल्याचे दिसते. ज्या ठिकाणी श्रावणबाळाने आपला देह त्याग केला त्या ठिकाणची दुरावस्था ही अत्यंत वाईट झालेली असून त्याकडे कोणीच लक्ष दिले नसल्याचे दिसून येते. त्या ठिकाणचे कधीच पाणी आटत नाही असे म्हणतात अन ते बरोबरही आहे कारण आजपर्यंत त्या श्रावण चलम्याचे पाणी आटले सुध्दा नाही. संपुर्ण मोहनावती ( मुखेड ) नगरी पुर्वी याच श्रावण चलम्याचे पाणी पित असे तर दुर दुर वरुन नागरीक पाणी घेण्यास याठिकाणी येत असे पण आज याच श्रावण चलम्याचे पाणी शेतीसाठी वापरत असताना दिसून येते तर झालेली पडझड पाहता अशा पौराणिक साहित्याची शासनातील पौराणिक खात्याने सुध्दा दखल अद्याप पर्यंत घेतली नसल्याचे दिसते.**

हे मंदीर हेमाडपंथी असून याचे कोरीव व नक्षीकाम काम हे अतिशय उत्कृष्ठ दर्जाचे आहे. या मंदीरास एक मुख्यव्दार असून तर दोन उपव्दार आहेत. मंदीराच्या खांबावर छोटी–छोटी चित्रे हस्तकलेने कोरलेली आहेत. खांबावर आधारशिला आहेत तर छतावरच्या झुंबरावर मोठी किर्तीमुख व कोरी व कामाच्या अनेक पट्या कोरल्या असून छतावर अर्धनारीश्र्वराची मुर्ती कोरली आहे. मंदीर बाहेरुन मगर, हत्ती, नंदी अशा वाहनावर उभे असलेल्या मात्रकाच्या मुर्ती आहेत. मंदीरामध्ये दत्तमुर्ती नागदेवताची मुर्ती व पार्वती मातेची मुर्ती आहे.

या मंदीराच्या बाहयबाजूस नक्षीकाम व कोरीव काम केलेले बहुसंख्य मुर्ती असून त्या रजाकाराच्या काळात छिन्न विच्छीन्न करुन मुर्तीभंग केलेल्याचे त्या काळात केल्याचे सांगितले जाते. मंदीरात पुर्णाकृती ६ शिला असून त्यापैकी ४ शिला मंदीरात आहेत तर २ बाहेरील भागात दिसतात. अर्धाकृती ४ शिला आहेत तर त्या आंतरभागात आहेत. आतील सर्व शिला हया एकाच दगडावर आहेत . तर मंदीरातील महादेवाच्या पिंडीच्या वरच्या बाजूस दगडाने कोरीव काम केलेले कमळ असल्याचे दिसते. संपुर्ण शिलावर कोरीव काम असून त्यामध्ये दशावतारी मुर्ती असल्याचे दिसतात त्यात वराह अवतार, नृसिंह अवतार, मत्स अवतार, कासव अवतार, बौध्द अवतार, कलकी अवतार, परशुराम अवतार, राम अवतार, वामन अवतार, व कृष्णा अवतार असे दशावतार मुर्ती खांबावर कोरीव केलेली आहे. तर काही खांबावर सती अवतारांचे ९ रुपांचे दर्शण ही होते. अर्धाकृती खांबावर सेविकांचे चित्र सुध्दा स्पष्ट दिसते तर वरील बाजूस दोन हत्ती असून ते स्वागत करत असल्याचे जानवते. पण या सर्व कलाकृतीला कृत्रिम प्रकारचे कलर लावल्याने त्याचे सौदर्य हे नष्ट झाल्याचे ही दिसून येते. हेमाडपंथी कलाकृतीला सध्याची रंगरंगोटी केल्याने त्याचे वास्तव रूप हरवल्याचे स्पष्ट जानवते. पुर्णाकृती व अर्धाकृती खांबावर विविध देवतांची चित्र रेखाटले असून एक उत्तम हस्तकला कशी असते याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे हे हेमाडपंथी मंदीर होय तर या मंदीरास भेटच दिल्यावरच याची अनुभूती कळेल.

**या हेमाडपंथी मंदीरात विविध प्रकारची कोरीव काम असेलेली चित्रे कुठेही व कोणत्याही मंदीरात पाहावयास मिळत नाहीत. गाभाऱ्यात ३ फुट उंचीची घडीव पिंड आहे. मंदीरच्या समोर सभामंडप व पाकशाळा आहे सभामंडपाचा जिर्णोध्दार झाला असून तेथे आष्टाग्रहीचे वेळी १९६८ च्या सुमारास यज्ञ झाला होता तर या मंदीरात महाशिवरात्रीला रात्री १२ वाजता पहिली पुजा होते. या मंदीराचे ट्रस्ट करण्यात आले असून या मंदीराची एक कमीटी सुध्दा आहे. मंदीराच्या बाजूला श्री गजानन महाराज यांचे मदीर असून तर बाजुस श्री साईबाबा चे मंदीर आहे. या हेमाडपंथी महादेव मंदीराचा म्हणावा तसा विकास झाला नसल्याचे दिसून येते हे मंदीर अर्धाकृती पाया पासुन पुर्ण हेमाडमंथी आहे तर वरच्या बाजूचे मंदीर हे बांधकाम केल्याचे दिसते.**

तर मंदीराच्या बाहेरील बाजूस जेमतेम २०० ते २५० च्या जवळपास कोरीव काम केलेल्या अंदाजे अडीच ते तीन फुट उंचीच्या विविध देवी देवतांच्या मुर्ती असून त्यांच्यावर निजामकालीन वार हे स्पष्ट दिसतात. तर मंदीराच्या पश्र्चिम, दक्षिण व उत्तर या तीनही ठिकाणच्या बाजूस तीन छोटेसे मंदीर केल्याप्रमाणे मुर्ती ठेवण्यासारखी जागा ठेवून उत्तम कलाकुसरीने हस्तकलेने रेखाटन केले आहे. तर त्यावर सुंदर असे मुकूट ही तयार केलेले आहे तर त्या मुकुटात विविध प्रकारच्या देवी देवतांच्या ५ ते ६ इंचाच्या मुर्ती व विविध कलाकुसर दिसतात.

संकलन
**ज्ञानेश्वर डोईजड**
संपादक,
दैनिक श्रमिक लोकराज्य
७८७५७८२३७७


# स्त्रीयात्त्वाची साखळी

ती एक नैसर्गीक प्राकृती...
हलती, बोलती, चालती आकृती
म्हणजे स्त्री...

पूर्वीच्या काळी स्त्री म्हणजे एक चाकोरीबद्ध जीवन जगणारी अनेक निर्बंध सहन करणारी स्त्री होती. पण जसजसं जग आधुनिक होत गेलं तसं तसं स्त्रियासुद्धा आधुनिक विचारांच्या होतं गेल्या. आजची स्त्री महिला ज्या उच्चपदावर कार्य करीत आहेत त्यानुषंगाने घरातील बंधने त्यांच्या वरील सेल होताना दिसत आहेत. आज पुरुषांपेक्षा स्त्रिया ह्या मोठा पदावर कार्यरत असून ..जे कार्य पुरुष करीत आहेत व त्यांची मक्तेदारी दाखवत आहेत. त्याच क्षेत्रामध्ये महिलां कंबर कसून कार्यरत आहेत. उदा: संरक्षण क्षेत्र, विमान, रेल्वे वाहतूक क्षेत्र, अंतराळायीन क्षेत्र, न्यायालयीन क्षेत्र अश्या अनेक अवघड समजली जाणारी क्षेत्रे याचबरोबर शेती–ग्रहउद्योग अशी बरीच क्षेत्रे आज महिलांनीकाबिज केली आहेत. व त्यात स्त्रिया अतुलनीय अशी प्रगती ही करीत आहे.

आजच्या घडीला पाहता महिला व मुली या शिक्षणाच्या क्षेत्रात सुद्धा आघाडीवर आहेत. पूर्वीच्या काळी स्त्रीयां वरती अनेक बंधने होती त्या शाळेत जात नव्हत्या, शाळेमध्ये जाण्यासाठी त्यांच्या वर बंधने घातली जात होती. परंतु आजचे चित्र बदलले आहे.

भारतात आज ८० टक्के स्त्रिया हा स्वातंत्र्य काळात नंतर सुशिक्षित झाल्या आहेत. आजकाल प्रत्येक पालक आपल्या मुलीला शाळेत पाठण्यासाठी व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी पुढाकार घेत आहे. आजची स्त्री ही आधुनिक विचारसरणीची आहे. जिथे महिलांवर अन्याय होतो तिथे आवाज उठवणारी आहे .ऐवढेच नाही तर प्रत्येक महिला ही त्यांची परिधन करायची वस्त्र आणि गरज ही ओळखुन आहे. तसेच लग्न जुळताना करण्यात येणार्या विचारांवर सुद्धा आधुनिक झाल्या आहेत.



**रूचिरा बेटकर**
नांदेड, मो. ९९७०७७४२११

महिलांवर होणार्या अत्याचाराचा विचार करता आज कायदा व सुव्यवस्था त्याच्या पाठशी आहे. त्यामुळे अत्याचारावर त्या ठामपणे बोलताना दिसत आहेत .याचबरोबर महिला संरक्षण कायदा किंवा महिला आरक्षण या विषयावर त्या लढाई देताना दिसत आहेत .

आज महिला घरातील बंधने झुगारून देत आहेत. ज्या महिला चूल आणि मूल एवढ्यावरच होत्या ते आज अनेक क्षेत्र पादाक्रांत करत आहेत. स्त्रिया संबंधित कुठलाही इतिहास काढून पाहिल्यास असे कळते की कुठल्याही कार्यास त्यांनी हात लावल्यास ते त्याचं यशस्वीच झालेले दिसून येते...त्याग, समर्पण, बलिदान यात ही त्या मागे नाहीत.

स्त्री हा समाजाचा मूलभूत घटक... नवी पिढी घडवणारी, कुटुंबव्यवस्थेला आकार देणारी, घराघरात सुसंवाद राखणारी... समाजात स्त्रीचं स्थान जितकं महत्त्वाचं, आदराचं, तितकाच तो समाज सभ्य, सुसंस्कृत. समजला जातो...

मुलगी, बहीण, मैत्रीण, आई, पत्नी वा अन्य जिव्हाळ्याची ही नाती स्त्रियांमुळे जोपासली जातात.. स्त्रीमुळे नातेसंबंधात एक वेगळीच मृदुता, जिव्हाळा, माया, प्रेम उत्पन्न होते. स्त्रियांमध्ये

खरी आत्मनिर्भरता येते ती आंतरिक बदलातून, वैचारिक आणि आध्यात्मिक परिवर्तनातून, शास्त्रीय ज्ञानातून, निकोप शरीरस्वास्थ्यातून आणि तर्कशुद्ध विचारसरणीतून... केवळ स्त्रियांसाठीच नव्हे तर पुरुषांसाठीही आत्मनिर्भर होऊन आपला व्यक्तिमत्वविकास कसा साधावा...हा बदल स्त्रियां मुळेच शक्य आहे.

आजच्या युगात स्त्रीयाने मोठी प्रगती केली असली तरी, कुठे तरी त्यांच्या मनात इतरांविषयी ईर्षा, द्वेश,मत्सर आणि तिरस्कार अजून ही घर करून उरलेलं आहे.

तो भाव जोपर्यंत बंद होत नाही... तो पर्यंत प्रत्येक स्त्री ही दुसर्या स्त्री ची वैरी राहणार आहे. त्यामुळें एकमेकास साह्य करून स्त्रियां च्या आत्मनिर्भर व आत्मसम्मान ची साखळी बनूया...बस एवढंच...

माझ्या सर्व सखीनां महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

## कविता – ती कोण आहे

ती रोज सकाळी, सर्वांच्या अगोदर उठते
आम्ही सर्व असतो झोपेत, तिच्या कामाला सुरू होते

ती रोज सर्वांसाठी, चवदार स्वयंपाक करते
आम्ही त्याला नावे ठेवतो, तरी ती कानाडोळा करते

ती रोजच आम्हा सर्वांची, एवढी देखभाल ठेवते
आमच्याकडून कसलीच, तिची कधी ही अपेक्षा नसते

सकाळपासून झोपेपर्यंत, ती खूप राब राब राबते
ती आजारी पडते जेव्हा , आम्हांला खरी किंमत कळते

मग ती कोण आहे ? आई आहे ताई आहे
ती कुणाची मावशी तर कुणाची बायको आहे

**– नासा येवतीकर,**
**९४२३६२५७६९**

# भगर खाताना काय काळजी घ्यावी

उपवासाला मोठ्या प्रमाणात भगरीचे सेवन केले जाते. भगर खाल्लयामुळे अन्न विषबाधा झाल्याच्या अनेक घटना महाराष्ट्रात वारंवार घडत आहेत. त्यामूळे भगर खाताना काळजी घ्यावी.

भगरीवर मोठ्या प्रमाणात अस्पारीगिलस प्रजातीच्या बूरशीचा प्रादुर्भाव होतो. ज्या मूळे फ्युमिगाक्लेविन यासारखी विषद्रव्ये(टॉक्जीन) तयार होतात. ऑक्टोबर महीन्यातील तापमान आणि आर्द्रता बूरशीच्या वाढीसाठी अनूकूल असते. अशी बूरशीचा प्रादुर्भाव झालेली भगर खाण्यात आल्यास अन्न विषबाधा होऊ शकते.

भगर खाताना काय काळजी घ्यावी


१. बाजारातून भगर आणल्या नंतर ती निवडून स्वच्छ करा. शक्यतोवर पाकीटबंद भगर घ्या. ब्रॅड नाव नसलेली किंवा लेबल नसलेली भगर पाकीटे व सूटी भगर घेऊ नका. भगर घेतांना पाकीटावरचा पॅकींग दिनांक व अंतिम वापर दिनांक तपासा.

२. भगर साठवताना ती स्वच्छ कोरड्या ठीकाणी, व्यवस्थित झाकणबंद डब्यात ठेवा, जेणेकरुन वातावरणातील ओलाव्यामूळे बूरशीची वाढ होणार नाही.जास्त दिवस भगर साठवू नका. जास्त दिवस साठवलेली भगर खाऊ नका.

३. शक्यतोवर भगरीचे पीठ विकत आणू नका. भगरीच्या पिठामध्ये वातावरणातील ओलावा शोषून घेण्याची क्षमता आधिक असते. त्यामूळे पिठाला बूरशीची लागण होण्याची शक्यता जास्त असते. भगरीच्या दशम्या किंवा भाकरी खाण्याऐवजी खिचडी खावी.

४. भगरीचे पीठ आवश्यक असेल तेवढेच दळून घ्या. जास्त दिवस पीठ साठवू नका. बाहेरुन दळून आणण्यापेक्षा घरीच दळा.

५. भगर आणि शेंगदाणे हे आधिक प्रथिनयुक्त पदार्थ आहेत. दोन तिन दिवस सलग उपवास असतांना या पदार्थांचे सेवन सिडीटी वाढण्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे उलटी, मळमळ व पोटाचे त्रास होतात. या पदार्थांचे सेवन पचनशक्ती नूसार मर्यादितच करावे.



भगरीचे सेवन करतांना या गोष्टी लक्षात ठेवा. म्हणजे संभाव्य अपाय टाळता येईल.

भगर विक्रेत्यांसाठी सुचना

१. विक्रेत्यांनी पॅकबंद भगरचीच विक्री करावी. भगर खरेदी करतांना घाऊक विक्रेत्याकडून पावती घ्यावी.

२. भगरीचे पॅकेट, पोत्यावर उत्पादकांचा पत्ता,परवाना क्र., पॅकींग दिनांक, अंतिम वापर दिनांक असल्याची खात्री करून घ्या.

३. मुदत बाह्य भगर किंवा भगर पिठाची विक्री करु नये.

४. सुटी भगर व खूले भगर पिठ शक्यतो विक्रीसाठी ठेऊ नये.

अन्न व औषध प्रशासनाचे वतीने भगर विक्री करणाऱ्या दुकानांची तपासणी करण्यात येत आहे. नियमाचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांवर अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत कारवाई घेण्यात येईल.

**– अन्न व औषध प्रशासन , नांदेड.**

# मुखेड येथे नवनिर्वाचित पोलिस पाटलांचा सत्कार व कार्यशाळा संपन्न

## पोलिस पाटील मानधनासह विविध समस्यावर चर्चा

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**मुखेड/प्रतिनिधी** : पोलीस पाटील पदाच्या परिक्षेत यशस्वी झालेल्यांची नुकतच पोलिस पाटील पदी निवड करण्यात आली आहे.निवडीचे आदेश मिळाल्यानंतर पोलिस पाटील म्हणून निवड झालेल्या मुखेड-कंधार विधानसभा क्षेत्रातील सर्व नवनिर्वाचित पोलीस पाटलांचा गावकामगार पोलीस पाटील संघ तालुका शाखा मुखेडच्या वतीने दि.०४ मार्च रोजी आर्य वैश्य मंगल कार्यालयात शॉल,फेटा, पुष्पगुच्छ,सन्मानचिन्ह देवून यथोचित सत्कार करण्यात आला तसेच सत्कार समारंभ सोहळ्यानंतर पोलीस पाटलांची




एकदिवसीय कार्यशाळा मोठ्या उत्साहता संपन्न झाली.यादरम्यान पोलिस पाटील यांचे मानधनासह विविध मागण्यां, काम करण्याची कार्यपद्धती व येणाऱ्या संमस्या यावर सविस्तर मान्यवरांनी मते मांडली.

सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावकामगार पोलिस पाटील संघाचे राज्याध्यक्ष बाळासाहेब पाटील शिंदे हे होते तर उदघाटक म्हणुन तहसीलदार राजेश जाधव, प्रमुख पाहुणे राज्यसंघटक बळवंतराव काळे, माजी सभापती खुशाल पाटील उमरदरीकर, सहाय्यक पोलिस निरीक्षक भालचंद्र तिडके, जिल्हाध्यक्ष भास्करराव पाटील कंकाळ, जिल्हासचिव संभाजी पाटील मंडगीकर, जिल्हा उपाध्यक्ष माधव टाकळे, शिवाजीराव पाटील जोगदंड नांदेड, गणेश ढेणे पाटील रायगड, लालासो कदम पाटील दौंड,महेंद्र पालसकर पुणे, कापसे पाटील भोकर, बालाजी मिरकले अहमदपूर, रमाकांत पाटील शिरुर अंनतपाळ, शंकर पाटील कदम अर्धापुर, सरपंच प्रतिनिधी डॉ.रणजित काळे, डॉ. संतोष शेंबाळे, महसूल सहाय्यक संदीप भुरे, तलाठी जि.डी.कल्याणकर, पत्रकार संतोष बेळगे,अनिल कांबळे, महेताब शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी राज्याध्यक्ष बाळासाहेब शिंदे, तहसीलदार राजेश जाधव, बळवंतराव काळे, एपीआय भालचंद्र तिडके,खुशाल पा.उमरदरीकर, संभाजी पा. मंडगीकर, भास्कर पा.कंकाळ यांची मनोगते झाली. सदर कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलनाने करण्यात आली.

**कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ.चंद्रकांत एकलारे यांनी केले तर प्रस्ताविक पोलिस पाटील संघाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा तालुकाध्यक्ष माधव पाटील टाकळे यांनी केले उपस्थितांचे आभार शिवकुमार गंदिगुडे यांनी मानले.यावेळी गावकामगार पोलिस पाटील संघाचे राज्य, विभाग,जिल्हा व तालुक्यातील पदाधिकारी व पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी गावकामगार पोलिस पाटील संघाचे मुखेड तालुका पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.**

# मायबापा नंतर लाखाच्या पगंती वाढुन धनवान होण्यापेक्षा जन्मदात्याची सेवा करून गुणवान व्हावं - शि.भ.प.श्रीदेवी स्वामी कापशीकर

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

माधव बैलकवाड

**नायगाव** : संताच्या आणि महापुरुषाच्या विचारात खरी संजीवनी मिळते आपल्या जीवनाची वाटचाल यशस्वी होण्यासाठी संताचे व महापुरुषांचे चित्र पाहून नव्हे तर त्यांची अनमोल चरित्र वाचून त्यांच्या विचाराने जीवनाची वाटचाल करावी, आणि माय बाप मेल्यानंतर त्यांच्या नावाने लाखाच्या पंगती बसवून धनवान होण्यापेक्षा त्या जन्मदात्याची सेवा करून गुणवान व्हावे, असे अमृतवाणी विचार शिवभक्त परायण शि.भ.प.सौ श्रीदेवी भीमाशंकर स्वामी कापशीकर यांनी आयोजित कीर्तन रुपी सेवेत व्यक्त केले.

नायगाव तालुक्यातील मौजे शेळगाव छत्री येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी समस्त गावकऱ्यांच्या वतीने सर्व धर्मीय अखंड शिवनाम सप्ताह चालू असून कीर्तनरुपी सेवेच्या पाचव्या दिवशी श्रीदेवी स्वामी कापशीकर आपल्या सेवेत म्हणाल्या की, जग हे उलटे चालले आहे, सध्या दानत्व लोप पावत आहे हाती दानत्व असावे तेव्हाच देव प्राप्ती होते असे ते सांगत पुढे म्हणाले की मायबाप मेल्यानंतर लाखाच्या पंगती वाढवून धनवान होण्याची लेबल लावून घेण्यापेक्षा जन्मदाते जिवंत असताना त्यांची सेवा करून गुणवान होण्याची लेवल लावून घ्यावे अशीही ते आवर्जून सांगितले. त्यांच्या कीर्तन रुपी सेवेमध्ये भोस्करताई, अमलापुरेताई, अनेरायेताई, वसमतेताई, यासह जनार्दन बेंद्रीकर, गणेश मुरुडकर, रामदास वसमत, मनमत पांडे, आत्माराम पाटील, शिवाजी कुंचेलीकर, प्रदीप चव्हाण, विजयकुमार द्रोणाचार्य, ज्ञानेश्वर स्वामी, ज्ञानेश्वर विभुते, शेखर अनेराये यांनी संगीताची साथ दिली तर यावेळी माजी सरपंच संजय पाटील आनेराये , माजी पोलीस पाटील उत्तमराव पांडे, विठ्ठल पाटील आणेराये ,श्याम पाटील चोंडे, सुरेश गुरव महाराज, मल्लिकार्जुन मठपती, माधव भाऊराव पाटील आणेराये ,बालाजी नारायण पाटील आणेराये ,शिवा पाटील आणेराये ,गंगाधर पाटील आणेराये ,विजय पाटील आणेराये ,वसंत आणेराये ,सुरेश आणेराये ,संभाजी किशनराव पाटील आणेराये,ज्ञानेश्वर पांडुरंग पाटील पांडे यासह महिला पुरुष यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

**सदर कीर्तनामध्ये अमृतवाणी विचार, बासरीचा मंजूळ स्वर आणि टाळांचा खळखळाट याने शेळगाव छत्री परिसरात सर्वत्र भक्तिमय वातावरण पसरले होते. तर भाविक भक्त तलीन होऊन कीर्तनाचा मनमुराद आस्वाद घेतले.**

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**मुखेड/प्रतिनिधी** : मुखेड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा सलगरा खुद येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त दानवीर कर्ण सेवा संघ फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष दीपक गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील कार्यक्रम घेण्यात आला आला. येथील विद्यार्थी व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वस्तू वही,पेन असे वाटप करण्यात आले . दीपक गायकवाड यांनी म्हणाले की, विद्यार्थ्यांना आर्थिक बाजू




शैक्षणिक साहित्य बाजू विद्यार्थी मदत लागेल तो आम्ही मदत करू. यावेळी उपस्थित दानवीर कर्ण सेवा संघ फाउंडेशन चे सचिव शेख सुलेमान सलगरेकर मुख्याध्यापक यू पी चव्हाण सर, सहशिक्षक कुरुळेकर, जे एम राठोड, एन सी भोसले ,एस डी मुदेवार आदी उपस्थित होते.

# लोहा तालुक्याला संभाव्य पाणीटंचाई भासणार नाही याची अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी - आमदार शामसुंदर शिंदे

## लोहा येथे आमदार शामसुंदर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संभाव्य पाणीटंचाई आढावा बैठक संपन्न

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

माधव ससाने

**लोहा** : पंचायत समिती कार्यालय लोहा तालुक्याच्या वतीने काल दि.०७ मार्च गुरुवारी लोहा तहसील कार्यालयात उन्हाळी संभाव्य पाणीटंचाई आढावा बैठक लोहा कंधार मतदारसंघाचे लोकप्रिय, कर्तव्यदक्ष आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, यावेळी तहसीलदार विठ्ठल परळीकर व लोहा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आडेराघो यांच्या हस्ते आमदार शामसुंदर शिंदे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला, यावेळी तहसीलदार विठ्ठल परळीकर, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आडेराघो, संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य तथा लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक चंद्रसेन पाटील गौडगावकर, शेकापचे नांदेड दक्षिण ग्रामीण जिल्हाध्यक्ष अवधूत पाटील शिंदे, खरेदी-विक्री संघाचे उपसभापती श्याम अण्णा पवार,पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता श्रीराम डिकळे ,जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उपअभियंता शिवाजी राठोड,, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अण्णाराव पवार, संचालक सुधाकर सातपुते, समन्वय समिती सदस्य सिद्धू वडजे, संचालक विश्र्वंभर पवार, शेकाप लोहा तालुका अध्यक्ष नागेश पाटील हिलाल सह सर्व विभागाचे विभाग प्रमुख, पदाधिकारी ,कार्यकर्ते ,कर्मचारी उपस्थित होते, यावेळी आमदार शिंदे यांनी पाणीपुरवठा विभागासह सर्व विभाग प्रमुखांचा विस्तृत आढावा घेतला, यावेळी इंधन विहीर ,अधिग्रहण, नवीन नळ योजना व नळदुरुस्ती, जलजीवन मिशन अंतर्गत चा पाणीपुरवठा आणि टँकर नवीन बोरवेल यासह सर्व संभाव्य पाणीटंचाई उपायोजना बाबी विषयी आमदार शिंदे यांनी उपस्थित प्रमुख अधिकाऱ्यांशी विस्तृत चर्चा करून संबंधित विभाग प्रमुखांना सूचना केल्या.

यावेळी बैठकीत अधिकाऱ्यांशी बोलताना आमदार शिंदे म्हणाले की तालुक्यात संभाव्य पाणीटंचाईला समोर जाण्यासाठी ज्या काही उपाययोजना व पाणी टंचाई निवारणार्थ नवीन प्रस्ताव असतील तर संबंधित अधिकाऱ्यांनी ते प्रस्ताव वेळेत दाखल करावेत मी त्या प्रस्तावाचा पाठपुरावा करणार असून लोहा तालुक्याला संभाव्य पाणीटंचाई चा सामना करावा लागणार नाही यासाठी प्रमुख अधिकाऱ्यांनी तात्काळ उपयोजना करण्याचे निर्देश आमदार शिंदे यांनी प्रमुख अधिकाऱ्यांना दिले.

पाणी टंचाई सारख्या अत्यंत महत्त्वाच्या कामात अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केल्यास संबंधित अधिकाऱ्यांची कदापी गयी केली जाणार नसल्याचेही यावेळी आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना खडसावले, उन्हाळ्यात सर्वसामान्य जनतेसह गुराढोरांना मुबलक पिण्याचे पाणी सहज उपलब्ध होण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तत्परता बाळगण्याचे निर्देश यावेळी आमदार शामसुंदर शिंदे यांनी पाणी टंचाई आढावा बैठकीत सर्व प्रमुख अधिकाऱ्यांना दिले.

# ज्ञानाची भूक ही सर्वश्रेष्ठ भूक आहे - अभिनेता अनिल मोरे

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

ॲड. सिध्दार्थ वाघमारे

**कंधार** : ज्ञानाची भूक ही सर्वश्रेष्ठ भूक आहे. असे प्रतिपादन सेवानिवृत सनदी अधिकारी व अभिनेता अनिल मोरे हे बाळांतवाडी येथील कंधार कॉलेज ऑफ फॉर्मसी या कॉलेजच्या गॅदरीन मध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलताना म्हणाले.

बाळातवाडी येथील कंधार कॉलेज ऑफ फार्मसी कॉलेजच्या गॅदरीन चे उद्दघाटन सेवानिवृत सनदी अधिकारी अनिल मोरे यांच्या हस्ते दिप प्रज्वलीत करुन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जय जवान जय किसान शिक्षण प्रसारक मंडळ कंधार या संस्थेचे सचिव डॉ. सुनिल धोडगे होते तर प्रमुख पाहूण्या म्हणून डॉ. सौ, ज्योतीताई धोडगे उपस्थित होत्या तर प्रमुख उपस्थितीत कंधार येथील जेष्ठ पत्रकार प्रल्हाद दे. आगबोटे, भारत राष्ट्र समितीचे जेष्ठ नेते व कंधार तालुक सरपंच संघटनेचे माजी अध्यक्ष दत्ताजी कारामुंगे ईत्यादी मान्यवर उपस्थित होते.

आपल्या भाषनात पुढे बोलताना अभिनेते अनिल मोरे म्हणाले की अन्नाची भुक ही जिवण जगण्यासाठी असते तर ज्ञानाची भुक हे अजअमर राहाण्यासाठी असते म्हणुन प्रत्येक विद्यार्थ्याला ज्ञानाची भूक लागली पाहिजे, तथागत महात्मा गौतम बुध्दानी सांगितल्या प्रमाणे अत्त दीप भव ! स्वंयदीप व्हा तुमचा मार्ग तुम्हीच शोधायचा आहे. तुमचं भविष्य तुमच्यावर आवलंबुन आहे. म्हणुन प्रत्येक विद्यार्थ्यांनी ज्ञानाच्या भुकेची कास धरली पाहिजे विद्यार्थ्यांनी सातत्य ठेवून अभ्यास केल्यास यश तुमच्या मागे धावुन येते यशाच्या मागे धावुन जाण्याची गरज नाही. असे सांगुन अभिनेता अनिल मोरे पूढे म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्यांनी आईवडीलाच्या कष्टाची जाणिव ठेवली पाहिजे. आई वडिलांच्या घामाच्या सुगंधावर तुमच्या आयुष्याचा मळा फुलतो. याची जानिव प्रत्येक विद्यार्थ्यानी ठेवली पाहिजे. जगात सर्वात सुंदर कोण असेल तर ती आपली आई आहे. म्हणुन कोणालाही विसरा पण मायबापाला विसरु नका असा मोलाचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला आहे. अध्यक्षीय समारोप करताना डॉ. सुनिल धोडगे म्हणाले की, आजचे युग हे स्पर्धेच युग आहे. स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर प्रत्येकाला अभ्यास केलाच पाहिजे अभ्यासा शिवाय पर्याय नाही. विद्यार्थ्यांना जिवनात येशाचे शिखर गाठायचे असेल प्रत्येकानी संकल्प केला पाहिजे आणि संकल्प पुर्ण करण्यासाठी अभ्यास करावाच लागेल असेही डॉ. सुनिल धोंडगे म्हणाले.

**या कार्यक्रमाचे प्रास्तिविक फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ.जमिल अहमद यांनी केले आहे. यावेळी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी. प्राध्यापडॉक्टर जमील अहमद ,सय्यद जवाद अली ,रूपेश इंगोले, अनिकेत कदम,संदीप गव्हाने,पल्लवी गणवीर ,प्रिया देशमुख, मोहम्मद जिशान इब्राहिम,मोहम्मद अमीन मेमन,शैख आबिद शब्बीर,सोनाली जाधव,प्रतिभा कागणे,सुमित रुद्रवार, अशीष गोडबोले, यावेळी विद्यार्थ्या प्रथमेस मुधळ, गुट्टे पूजा, गायत्री जयस्वाल, वैभव वाघमारे, मुरलीधर शिंदे, मंगेश कदम, धनाजी डांगे, प्राची देशमुख, धनश्री देशमुख, स्नेहा दळवे, साक्षी कौसल्य, गजानन बोरोले यानी अतिश्यय मेहनत घेवुन कार्यक्रम यशस्वी केला आहे**

# विविध मागण्या संदर्भात लोकस्वराज्य आंदोलनाचा नायगाव तहसील कार्यालयावर मोर्चा धडकला

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

माधव बैलकवाड

**नायगाव** : ईव्हीएम मशिन हटवून मतदान प्रक्रिया बॅलेट पेपरवर घ्यावे, एक देश एक अभ्यासक्रम कायम करावे, कंत्राटी नोकर भरती बंद करावे, तहसील व पंचायत समितीमधील मनमानी कारभार व भ्रष्टाचार थांबवा या प्रमुख मागण्यासह अन्य मागण्यासाठी लोकस्वराज्य आंदोलनाच्या वतीने गणपत रेड्डी व डी के पवार यांच्या नेतृत्वाखाली नायगाव तहसील कार्यालयावर मोर्चा धडकला आहे.

नायगाव शहरातील जुनी तहसील येथून हेडगेवार चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉक्टर अण्णाभाऊ साठे चौक, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते क्रांती पिता लहुजी साळवे चौकापासून तहसील कार्यालयाकडे मोर्चा भर उन्हात



प्रचंड घोषणाबाजी करीत तहसील कार्यालयावर धडकला आहे, यामध्ये प्रा. डॉ. शंकर गड्डमवार ,संघटनेचे प्रमुख प्रा. रामचंद्र भरांडे, कामगार आघाडीचे प्रमुख रावसाहेब पवार, गणपत रेड्डी, दत्तराज गायकवाड चंद्रपूर, जिल्हाध्यक्ष धोंडोपंत बनसोडे यांनी मोर्चेकरी बांधवांना तीव्र शब्दात व देशातील एकंदरीत परिस्थितीबद्दल सखोल असे मार्गदर्शन केले आहे. सदर मोर्चेकरी बांधवांच्या मागण्याचे निवेदन तहसील कार्यातील प्रतिनिधी यांना येऊन निवेदन स्वीकारले आहे तर आक्रोश पणाने काढण्यात आलेल्या मोर्चा यामध्ये ज्वलंत समाजाच्या मागण्या प्रामुख्याने होत्या. परंतु शांततेत मोर्चा यशस्वी काढण्यात आला आहे. यावेळी शेषराव रोडे, राजेंद्र रेड्डी, तुकाराम घंटेवाड, मारुती घोरपडे, चंद्रकांत सूर्यतळ, बाबुराव इंगळे, आनंदा सूर्यतळ, प्रल्हाद भालेराव, नागोराव कमलाकर, नामदेव गायकवाड, प्रकाश ननुरे, संभाजी वाघमारे, हनुमंत घोरपडे, कैलास सूर्यवंशी यासह महिला पुरुष यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. तर नायगाव पोलीस ठाणे येथील पोलीस कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त होता.

**सदर मोर्चा मध्ये लोकस्वराज्य आंदोलनाचे प्रमुख प्रा.रामचंद्र भरांडे यांनी ईव्हीएम मशीन बंद नाही झाल्यास जागोजागी मशीन फोडण्यात येईल असा तिव्र इशारा यावेळी शासनाला त्यांनी दिला आहे.**

# वाघू अँग्रो शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड भोकर च्या वतीने वाघू बांबू खरेदी विक्री केंद्राचे उद्घाटन संपन्न

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**भोकर/प्रतिनिधी** : दि.७ मार्च २०२४ रोजी गुरुवार सकाळी ठीक अकरा वाजता वाघू शेतकरी उत्पादक कंपनी भोकर च्या वतीने आयोजित बांबू खरेदी विक्री केंद्राचे उद्घाटन दिलीप दमय्यावार जिल्हा प्रबंधक नाबार्ड बँक नांदेड यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

भोकर व भोकर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी शेतकऱ्यांनी स्थापन केलेल्या शेतकरी उत्पादक कंपनी ची स्थापना होऊन एक वर्ष पूर्ण झाले शेतकऱ्यांसाठी बांबू लागवड व शेती उपयोगासाठी लागणारे बांबू हे उपलब्ध व्हावे व बांबूक्षेत्रात शेतकऱ्यांचा सहभाग वाढवा यासाठी महाराष्ट्र बांबू प्रवर्तन प्रतिष्ठान मुंबईच्या अर्थसहाय्याने भोकर येथे बांबू खरेदी विक्री केंद्राची सुरुवात करण्यात आली याप्रसंगी प्रमुख पाहुणे सौ डॉक्टर शोभा वाघमारे मॅडम संचालक महाराष्ट्र बांबू विकास मंडळ नागपूर यांची उपस्थिती होती व तसेच तालुका कृषी मंडळ अधिकारी श्री मिसाळ सर तालुका व्यवस्थापक आत्मा श्री दत्ता सूर्यवंशी शाहू महाराज विद्यालयाचे प्राचार्य संजय देशमुख सर जांभळी येथील विद्यमान सरपंच छाया कुंचलवाड मॅडम सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ क्लस्टर हेड श्री गणेश बोडके सर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात रिबीन कापून व बांबूची पूजा करून करण्यात आले सदरील कार्यक्रमाचे आयोजन कंपनीचे संचालक व सभासद यांनी केले कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री शिवाजी खांडरे व कंपनीची माहिती श्री वीरभद्र गाडे तर आभार राजेंद्र राठोड यांनी मांडले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री काळेश्वर गणपती देवडे यांनी केले.

**कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संचालक मंडळ श्री उमाकांत कुराडे परमात्मा वागावकर सौ जयश्री सावळे ज्ञानेश्वर महादेवाड आदि परिश्रम घेतले**






















हे वृत्तपत्र, मालक, प्रकाशक व संपादक **डोईजड ज्ञानेश्वर बालाजीराव** यांनी मुद्रक **सतिश विजय सोनवणे** यांच्या **यश प्रिंटर्स अँड पब्लिकेशन शिवाजी नगर नांदेड ता.जि. नांदेड (महाराष्ट्र) – ४३१६०२** येथे प्रकाशित केले.
E-MAIL - shramiklokrajya@gmail.com

**Daily Shramik Lokrajya,** Owner, Publisher & Editor **DOIJAD DNYANESHWAR BALAJIRAO,** Printer **SATISH VIJAY SONWANE**. Printed at **YASH PRINTERS & PUBLICATION HOUSE NO, 1-2-211, SHIVAJI NAGAR, NANDED**, Tq. Dist. **NANDED**, (Maharashtra) - 431602 M.S. & Published Near **AT POST. GAYATRI NAGAR, MUKHED TQ. MUKHED, DIST. NANDED-431715**
Email : shramiklokrajya@gmail.com